महापालिका आयुक्त कार्यालय ९ ९०
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- मआ/घकव्यका/2076
दिनांक :- 10/09/2020

## कार्यालयीन आदेश

विषय :- कोविड-१९ साथरोग आजाराच्या पार्श्वभूमीवर शहरातील कोणतीही सार्वजनिक ठिकाणे, शासकीय व खाजगी कार्यालये याठिकाणी मास्क न वापरता संचार करणा-या व्यक्तींवर व सार्वजनिक ठिकाणी थुंकणे याकरीता प्रभावी दंडात्मक कारवाई करणेबाबत.

संदर्भ :- १. मा. विभागीय आयुक्त (पुणे) कार्या क्र/सा.प्र.१/आरआर/१०२४/२०२० यांचे दि.२८/०८/२०२० रोजीचे पत्र.

२. मा. महापालिका आयुक्त यांचे अधिकार सुपुर्ती आज्ञापत्रक क्र.एम.सी/डीईएल/१५२०, दि. ३१/०८/२०२०.

३. मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/३३३, दिनांक ३१/०८/२०२० रोजीच्या मान्यतेअन्वये जा.क्र. मआ/घकाव्यका/१८९४, दिनांक ३१/०८/२०२० रोजीचे कार्यायीन आदेश.

महोदय,

कोविड-१९ आजाराचा प्रसार रोखण्याच्या अनुषंगाने साथ रोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांन्वये कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काम केले जात आहे.

याच अनुषंगाने संदर्भ क्र. १,२ व ३ अन्वये कोविड-१९ साथरोग आजाराच्या पार्श्वभूमीवर शहरातील कोणत्याही सार्वजनिक ठिकाणे, शासकीय व खाजगी कार्यालये याठिकाणी मास्क न वापरता संचार करणा-या व्यक्तींवर रक्कम रु.५००/- तसेच सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या व्यक्तींवर रक्कम रु.१०००/- दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार पुणे महानगरपालिके मधील कार्यरत सर्व उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, प्रमुख/उप आरोग्य निरीक्षक, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, अतिक्रमण निरिक्षक, परवाना निरिक्षक, मेंटेनेन्स सर्व्हेअर व कार्यालयीन अधिक्षक, यांना तसेच पुणे शहरातील सर्व पोलिसांना दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

यासाठी पुणे महानगरपालिका अंतर्गत कार्यरत वरील श्रेणीतील सर्व अधिकारी यांनी दैनंदिन स्वरूपात दंडात्मक कारवाई करावयाची आहे. त्यासाठीची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे असणार आहे.

१. पुणे महानगरपालिका मुख्य इमारत अंतर्गत तसेच महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कार्यरत सर्व उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण निरिक्षक, परवाना निरिक्षक, मेंटेनेन्स सर्व्हेअर व कार्यालयीन अधिक्षक यांनी शहरातील कोणतीही सार्वजनिक ठिकाणे, शासकीय व खाजगी कार्यालये याठिकाणी मास्क न वापरता संचार करणा-या व्यक्तींवर व सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करावयाची आहे.

Scanned with CamScanner

२. यासाठी आवश्यक असणारी पावती पुस्तके प्रत्येक उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, अतिक्रमण निरिक्षक, परवाना निरिक्षक, मेंटेनेन्स सर्व्हेअर व कार्यालयीन अधिक्षक यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून घेऊन जायचे आहेत.

३. केलेल्या दंडात्मक कारवाईचा भरणा दैनंदिन स्वरूपात FI19A101 या अर्थशिर्षकावर आपले नजीकच्या क्षेत्रिय कार्यालयांतर्गत नागरी सुविधा केंद्रामार्फत भरणा करण्यात यावा. चेकद्वारे दंड भरणार असल्यास "मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका" या नावाने चेक घेवून तो पांढरे चलन करून बँक ऑफ महाराष्ट्र येथे भरणा करण्यात यावा. चलनावर कारवाई बाबतचा स्पष्ट उल्लेख उदा. मास्क न लावणे किंवा सार्वजिन ठिकाणी थुंकणे असा उल्लेख करणे आवश्यक आहे.

४. केलेल्या दंडात्मक कारवाईचा दैनंदिन अहवाल आपल्या खात्यामार्फत घनकचरा व्यवस्थापन कार्यालयाकडे swmadmin@punecorporation.org या संकेतस्थळावर पाठवायचा आहे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रती,

सर्व खातेप्रमुख, पुणे महानगरपालिका.
सह/उप आयुक्त, परिमंडळ १ ते ५, पुणे महानगरपालिका.
महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालये, पुणे महानगरपालिका.

Scanned with CamScanner